Vol. 5 | No 5 | October 2019

Impact Factor: 4.197 | ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A Peer Reviewed Bimonthly International Journal

Special Issue On

## IMPACT OF SOCIAL MEDIA ON SOCIETY




**Guest Editor**
**Dr. Vasant Satpute**

**Associate Editor**
**Dr. M. D. Kachave**

**Assistant Editors**
**Dr. B. V. Andhale**
**Dr. M. G. Somvanshi**
**Dr. A. B. Sarkale**

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

# अनुक्रमणिका


१. शिवसेनेचे राजकारण आणि सोशल मिडिया
**प्रा.संजय मोहाडे / डॉ.सुनिल शिंदे** | 07

२. आसाराम लोमटे यांचे वर्तमानपत्रातील लेखांचे सामाजिक स्वरुप : एक अभ्यास / **संजय नामदेवराव आठवले** | 11

३. समाजासमोरीलसोशल मिडीयाची नवी आव्हाणे / **डॉ.अतुल कदम** | 18

४. सोशल मिडियाच्या दुष्परिणामावर भाष्य करणारे नाटक : मना सज्जना /
**डॉ. संदिप बनसोडे / सुनिल सदाशिवराव कांबळे** | 23

५. महिला आणि सोशल मिडिया / **डॉ. अंबादास पांडुरंग बर्वे** | 27

६. पर्यावरण आणिसोशल मिडिया / **डॉ.बोचरे जे.एम.** | 33

७. समाजमाध्यमांच्या जगातातील पत्रकारिता: सद्यस्थिती, ट्रेंड्स आणि आव्हाने /
**शरद बोदगे** | 36

८. सोशल मिडीया आणि राजकारण /
**प्रा. स्वाती बोकारे / डॉ. स्वाती पाटील** | 39

९. समाज माध्यमं आणि भारतीय शास्त्रीय संगीत / **सौ.संगीता र. चाटी** | 43

१०. सोशल मिडिया आणि शेतीमालाचे विपणन / डॉ.बी.आर. शिंदे | 48

११. प्रसारमाध्यमे आणि बदलते जीवनप्रवाह / **डॉ. चंद्रकांत गजेवाड** | 52

१२. सोशल मिडिया आणि बँक व्यवहार / **डॉ. देशमुख एम.व्ही.** | 55

१३. व्यक्तिसंबंधावर सोशल मिडियाचा प्रभाव / डॉ. बालाजी डिगोळे | 58

१४. युवक आणि समाजमाध्यम / **डॉ. मोराती बा. भोसले** | 63

१५. आधुनिक राजकारणात सोशल मिडीयाची भुमिका / **डॉ.साहेब राठोड** | 67

१६. सामाजिक प्रसार माध्यमांमुळे निर्माण होणारी सायबर गुन्हेगारी /
**गोपाळ गांगर्डे** | 71

१७. सामाजिक प्रसार माध्यमांमुळे निर्माण होणारी सायबर गुन्हेगारी /
**डॉ. सुनिता आ. टेंगसे / गोपाळ म. गांगर्डे** | 77

१८. नवतंत्रज्ञानाचा सोशलमिडियावर पडलेला प्रभाव / **आदित्य गुंड** | 83

१९. कृषी विस्तार आणि संवादामध्ये समाजमाध्यमांचा (सोशल मिडीया) वापर /
**जयंत दा. गायकवाड** | 89





२०. सोशल मीडिया आणि आजची वस्तूस्थिती / **डॉ. एम. डी. कच्छवे** | 98

२१. नवतंत्रज्ञानाच्या साह्याने मराठीचे अध्यापन / **सखाराम बा. कदम** | 102

२२. माध्यमांच्या सामाजिक जबाबदारचे अवलोकन / **डॉ. हरिभाऊ कदम** | 106

२३. ग्रंथालय व सोशल मिडिया / **संगिता कातळे** | 110

२४. सोशल मिडीया आणि शैक्षणिक व्यवस्था / **डॉ.कहाळेकर जी.वाय.** | 115

२५. सोशल मिडियाचा समाजावरील प्रभाव / **मनीषा तु. खंडाळे** | 118

२६. सोशल मीडिया आणि सायबर गुन्हेगारी / **डॉ.सचिन खोकले** | 123

२७. ग्रंथालयात सोशल मीडीयाचा वापर– एक दृष्टिक्षेप /
**कु. शारदा के. लांजेकर** | 126

२८. साहित्य आणि सोशल मिडिया / **डॉ. राम मायकर** | 132

२९. सोशल मिडीया- आनंददायी भस्मासुर / **डॉ. मोहन मिसाळ** | 135

३०. प्रसार माध्यमाचे बदलते स्वरूप / **डॉ.अंभुरे एस.डी** | 138

३१. समाजमाध्यमांचा सुनियोजि तवापर महिलांसाठी वरदान /
**डॉ. जयदेवी पवार** | 141

३२. माध्यमांची सामाजिक बांधीलकी : एक चिंतन / **डॉ.श.द. परळकर** | 145

३३. पत्रकारिता आणि सोशलमिडीया / **समाधान दराडे** | 149

३४. सोशल मिडीयाची बँकींग क्षेत्रातील भूमिका / डॉ.सावके भागवत शा. | 155

३५. समाजासमोरील सोशल मिडीयाचे नवीन आव्हाने / **डॉ.शिंदे सुरेखा स.** | 158

३६. प्रसारमाध्यमातून मराठी साहित्यदर्शन : एक शोध /
**डॉ. नामदेव सोडगीर** | 161

३७. सामाजिक माध्यमांचा प्रशासनावरील प्रभाव /
**डॉ.सोमवंशी मुक्ता (गंगणे)** | 166

३८. कृषि क्षेत्रावरील समाजमाध्यमांचा प्रभाव /
**स्वप्नील उबाळे / प्रा.डॉ.सोमवंशी मुक्ता** | 173

३९. सोशल मिडीयाची क्रिडा क्षेत्रातील भुमिका व योगदान /
गोविंद वाकनकर | 179

४०. समाजावर सोशल मीडियाचा प्रभाव / **यादव कल्याण द.** | 182

४१. महिला आणि सोशलमीडिया / **आरती श्या. खांबेकर** | 186

४२. राजकारण आणि सोशलमिडिया / **अशोक कि. वाकडे.** | 192

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

38.

# कृषि क्षेत्रावरील समाजमाध्यमांचा प्रभाव

**स्वप्नील उबाळे,** बी.ए. द्वितीय वर्ष
संशोधक विद्यार्थी
**अजय जाधव,** बी.ए. द्वितीय वर्ष
संशोधक विद्यार्थी

**प्रा.डॉ.सोमवंशी मुक्ता**
मार्गदर्शक
सहयोगी प्राध्यापक व लोकप्रशासन
विभागप्रमुख के.र.व. महाविद्यालय, सोनपेठ

आधुनिक युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग म्हणुन ओळखले जात आहे. जगात सर्वत्र माहिती तंत्रज्ञानाचा बोलबाला आहे. जगातील कोणतीही माहिती एका क्लिकवर आज प्राप्त होत आहे. या माहिती तंत्रज्ञानातील आणखी एक महत्वाचा अविष्कार म्हणजे सोशल मिडिया अर्थात समाज माध्यमे होय. समाज माध्यमामुळे एकाच वेळी अनेक लोक ऐकमेकांना जोडले जात आहेत. आणि विशेष म्हणजे जगाच्या कानाकोपऱ्यातील लोक या समाज माध्यमामुळे जोडले जात आहेत. आज समाज माध्यमाद्वारे विविध प्रकारची माहिती दिली जाते. समाज माध्यमांच्या सहाय्याने उद्योग व्यवसाय करणाऱ्याची संख्या वाढत आहे. तसेच विविध क्षेत्राविषयीची माहिती समाज माध्यमातुन दिली जात आहे. शिक्षण, कृषी, व्यवसाय, रोजगार या विषयी माहिती देणारे वेगवेगळे ॲप्स आढळुन येतात.

भारत हा कृषी प्रधान असल्यामुळे कृषी व्यवसायासाठी आवश्यक असलेल्या माहितीचा प्रसार करण्यासाठी कृषी क्षेत्राशी संबंधित ॲप्स तयार करण्यात आले आहेत. तसेच कृषि उत्पादन ऑनलाईन विकण्यासाठी किसान सेवा, महाराष्ट्र राज्य कृषी पवन मंडळ, किसान अभियान अशा ॲप्सचा वापर करून शेतकरी आपल्या शेतीमालाची ऑनलाईन विक्री करू शकतात. तसेच पिकांवरील रोगाची पाहणी व नियंत्रण करण्यासाठी Plantix हा ॲप आहे. या ॲप्सच्या माध्यमातुन संपूर्ण माहिती शेकऱ्यांना मिळु शकते. कर्नाटकात भाताच्या शेतीसाठी या ॲप्सचा मोठ्या प्रमाणात फायदा घेतला जात आहे. तसेच शेतकरी ॲप, कृषी ॲप, जय किसान, किसान मित्र असे अनेक ॲप उपलब्ध आहेत.

सोनपेठ परिसरातील शेतकऱ्यांना अशा समाज माध्यमांचा फायदा होतो का ? तसेच समाज माध्यमांचा कृषी क्षेत्रावर प्रभाव पडला आहे का ? हे शोधण्यासाठी प्रस्तुत शोधनिबंध लिहिण्यात आला आहे.

**संशोधन पध्दती :-** कृषी क्षेत्रावरील समाज माध्यमांचा प्रभाव हा शोध निबंध लिहिण्यासाठी विश्लेषणात्मक पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

**तथ्य संकलन :-** प्रस्तुत शोध निबंधासाठी प्राथमिक व दुय्यम साधन सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. प्राथमिक साधनामध्ये मुलाखत अनुसूची, निरिक्षणाचा

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

अवलंब करण्यात आला आहे. तर दुय्यम साधन सामग्रीमध्ये संदर्भ ग्रंथ, मासिक, वृत्तपत्रे व इंटरनेटचा आधार घेण्यात आला आहे.

**उद्देश :-**

१) कृषी क्षेत्राविषयीच्या विविध समाज माध्यमांचा शोध घेणे.

२) कृषी क्षेत्रावरील समाज माध्यमांचा प्रभाव अभ्यासणे.

**गृहितकृत्य :-**

१) आधुनिक तंत्रज्ञानामुळे कृषी क्षेत्राच्या विकासाला गती प्राप्त झाली.

२) शेकऱ्यांना कृषी क्षेत्राविषयीचे ज्ञान मिळणे सोपे झाले.

सोशल मिडिया हा शब्द आज सर्वत्र रूढ झाला आहे. सोशल मिडियामुळे अनेक लोक भोगोलिकदृष्ट्या दूर असूनही आपले विचार एकमेकांसमोर प्रभावीपणे मांडु लागले आहेत. समाज माध्यमातून विविध प्रकारची माहिती सहज मिळत आहे. प्रत्येक क्षेत्राशी निगडीत अनेक ॲपस आज उपलब्ध आहेत. तसेच ते कृषी क्षेत्रासाठी सुध्दा उपलब्ध झाले आहेत. आजचे तरूण शेतकरी निश्चितच या समाज माध्यमांचा योग्य वापर करून आपल्या व्यवसायामध्ये प्रगती करू शकतात. तेंव्हा सोनपेठ परिसरातील शेतकऱ्यांचा या अनुषंगाने अभ्यास करण्यात आला. समाज माध्यमांना अनुसरून त्यांची मुलाखत घेण्यात आली. या प्राप्त माहितीचे विश्लेषण खालील प्रमाणे आहे.

हे संशोधन कृषी क्षेत्राशी निगडीत असल्यामुळे त्याच्याशी निगडीत अनेक प्रश्न विचारण्यात आले. आपल्या देशात दोन प्रकारची शेती केली जाते. १) कोरडवाहु व २) बागायती तेंव्हा मुलाखत दात्यांना प्रश्न विचारण्यात आला आपली शेत जमीन कोणत्या प्रकारची आहे ? यावर मिळालेल्या माहितीचे विश्लेषण खालील तक्त्यामध्ये देण्यत आले आहे.

**तक्ता क्र. १**

| अ.क्र. | शेत जमिनीच प्रकार | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | बागायती | २४.१३% |
| २ | कोरडवाहू | ७५.८७% |

वरील तक्ता क्र. १ चे निरिक्षण केले असता बागायती शेती असणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या २४.१३% असल्याचे निदर्शनास येते. तसेच कोरडवाहू शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या ७५.८७% एवढी असल्याचे निदर्शनास आले.

आधुनिक काळात कृषी क्षेत्रामध्ये खूप मोठ्या प्रमाणात संशोधन झाले आहे. काही शेतकरी या संशोधनाचा फायदा घेऊन आपल्या कृषी उत्पादनात भरघोष वाढ करीत आहे. सोनपेठ तालुक्यातील शेतकरी या तंत्रज्ञानाचा उपयोग करतात का ? हे



Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

शोधण्यासाठी त्यांना आपण शेती कोणत्या पध्दतीने करता ? असा प्रश्न विचारण्यात आला असता मिळालेली माहिती खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आली.

**तक्ता क्र. २**

| अ.क्र. | शेती पध्दती | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | पारंपारिक पध्दती | ८२.७५% |
| २ | कोरडवाहू | १७.२५% |
| | एकूण | १००% |

वरील तक्ता क्र. २ चे निरिक्षण केले असता असे निदर्शनास येते की, सोनपेठ तालुक्यात पारंपारिक पध्दतीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या ८२.७५% आहे. तर तांत्रिक पध्दतीने शेतकी करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या ही १७.२५% एवढी आहे. यावरून असे स्पष्ट होते की, सोनपेठ तालुक्यात तांत्रिक पध्दतीचा वापर करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या फार कमी आहे.

शेती व्यवसायात प्रगती घडवुन आणण्यासाठी तंत्रज्ञानाचा उत्तम उपयोग करता येतो. आत कृषी विद्यापीठे व इतर संस्थाच्या माध्यमातून कृषी पिकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी वेगवेगळे ॲप्स तयार करण्यात आले आहेत. त्याचा वापर शेतकऱ्याकडुन केला जातो का ? हे पाहण्यासाठी त्यांना शेतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कृषी विभागाकडुन काही ॲप्स काढण्यात आले आहेत त्याचा वापर करता का ? असा प्रश्न विचारण्यात आला असता मिळालेली माहिती खालील तक्ता क्र. ३ मध्ये दर्शविण्यात आली आहे.

**तक्ता क्र. ३**

| अ.क्र. | घटक | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | होय | ३१.०३% |
| २ | नाही | ६८.९७% |
| | एकूण | १००% |

विद्युत पंपावर नियंत्रण ठेवण्यासठी तो आपल्या मोबाईलशी जोडला असता त्याची माहिती आपण घरबसल्या घेऊ शकतो. या तंत्रज्ञानाचा फायदा शेतकरी घेतात का ? हे पाहण्यासाठी त्यांना आपल्या शेतातील विद्युत पंप मोबाईलशी जोडला आहे का ? असा प्रश्न विचाला असता १००% शेकऱ्यांनी आम्ही त्याचा वापर करीत नाहीत असे उत्तर दिले.

आज सर्वत्र फेसबुक, युटुब, व्हॉट्सॲप या समाज माध्यमांमधुन कृषी विषयीची वेगवेगळी माहिती दिली जाते. त्याचा आपण शेती व्यवसायासाठी उपयोग करू शकतो. याचा फायदा सोनपेठ तालुक्यातील शेतकरी किती प्रमाणात घेतात हे पाहण्यासाठी त्यांना समाज माध्यमातून कृषी विषयी मिळणारी माहिती आपणास

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

कामी येते का ? असा प्रश्न विचारण्यात आला असता मिळालेली माहिती खालील तक्ता क्र. ४ मध्ये दर्शविण्यात आली आहे.

**तक्ता क्र. ४**

| अ.क्र. | घटक | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | होय | ५१.७३% |
| २ | नाही | ४८.२७% |
| | एकूण | १००% |

वरील तक्ता क्र. ४ चे निरिक्षण केले असता समाज माध्यमांमधुन मिळणाऱ्या माहितीचा वापर करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या ५१.७३%एवढी आहे. तर नाही म्हणणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या ४८.२७ % एवढी आहे. यावरून असे स्पष्ट होते की, जवळपास ५०% शेतकरी समाज माध्यमातून कृषी विषयी मिळणारी माहिती वाचतात व त्याचा फायदा घेतात.

तसेच समाज माध्यमातुन हवामान खात्याच्या माहितीचा प्रसार होतो. ही माहिती शेकऱ्यांना उपयुक्त ठरते का ? हे पाहण्यासाठी विचारण्यात आलेला प्रश्न, समाज माध्यमातुन हवामान खात्याचा अंदाज सांगीतला जातो, आपणास त्याचा उपयोग होतो का ? असा प्रश्न विचारण्यात आला असता मिळालेली माहिती खालील तक्त्यात दर्शविण्यात आली आहे.

**तक्ता क्र. ५**

| अ.क्र. | घटक | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | होय | ७९.३२% |
| २ | नाही | २०.६८% |
| | एकूण | १००% |

समाज माध्यमामधून हवामान खात्याच्या अंदाजचा फायदा घेणारे शेतकरी ७९.३२% असल्याचे आढळून येतात. यावरून असे स्पष्ट होते की, समाज माध्यमामधून मिळणाऱ्या माहितीचा उपयोग शेतकऱ्यांना मिळतो आहे.

आधुनिक काळात शेतकऱ्याकडे जमिनी फार कमी आहेत. केवळ शेतीवर उपजिविका करणे आजच्या परिस्थितीत शक्य होत नाही. तर त्याला जोड व्यवसाय करणे आवश्यक आहे. तेंव्हा सोनपेठ तालुक्यातील शेतकऱ्यांची या दृष्टीने माहिती घेण्यासाठी त्यांना आपण जोड व्यवसाय करता का ? असा प्रश्न विचारण्यात आला असता प्राप्त माहिती खालील तक्ता क्र. ६ मध्ये दर्शविण्यात आली आहे.

**तक्ता क्र. ६**



Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

| अ.क्र. | घटक | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | होय | ५१.७३% |
| २ | नाही | ४८.२७% |
| | एकूण | १००% |

वरील तक्ता क्र. ६ चे निरिक्षण केले असता असे निदर्शनात आले की, जोड व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या ५१.७३ % असल्याचे दिसून येते. तर ४८.२७% शेतकरी केवळ शेतीवर अवलंबून आहे. तसेच उद्योग व्यवसायासाठी समाज माध्यमांचा उपयोग होतो का ? असा प्रश्न विचारण्यास आला असता ३४.४९% शेतकऱ्यांनी त्याचा उपयोग होता असे मत मांडले. यावरून कृषी क्षेत्रामध्ये जोड व्यवसाय करणारे शेतकरी समाज माध्यमांचा फायदा घेताना दिसून येते.

अलीकडच्या काळामध्ये ऑनलाईन खरेदी -विक्री करण्याचे प्रमाण वाढले आहे. यासाठी वेगवेगळे अॅप्स उपलब्ध आहेत. तेंव्हा अशा समाज माध्यमांच्या उपयोग शेतकरी त्यांच्या मालाच्या विक्रीसाठी करतात का हे पाहण्यासाठी त्यांना आपले कृषी उत्पादन विक्रीसाठी समाज माध्यमांचा फायदा होतो का ? अस प्रश्न विचारण्यात आला असता मिळालेली माहिती तक्ता क्र. ७ मध्ये दर्शविण्यात आली आहे.

**तक्ता क्र. ७**

| अ.क्र. | घटक | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | होय | ७२.४१% |
| २ | नाही | २७.५९% |
| | एकूण | १००% |

वरील तक्ता क्र. ७ चे निरिक्षण केले असता असे निदर्शनात आले की, शेतकऱ्यांना समाज माध्यमातुन कृषी उत्पन्नाचे बाजारभाव सहज मिळतात त्यामुळे याचा फायदा घेणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण ७२.४१% असल्याचे आढळुन येते.

समाज माध्यमामधून शेती विषयीची वेगवेगळी माहिती प्रसारीत केली जाते या माहितीमुळे शेती व्यवस्थापन सुधारण्या होण्यास मदत झाली का हे पाहण्यासाठी शेतकऱ्यांना सोशल मिडियामुळे शेती व्यवसायात सुधारणा होण्यास मदत झाली का ? असा प्रश्न विचारण्यात आला असता मिळालेली माहिती खालील तक्ता क्र. ८ मध्ये दर्शविण्यत आलेली आहे.

**तक्ता क्र. ८**

| अ.क्र. | घटक | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | होय | ७२.४२% |

| | | |
|---|---|---|
| | नाही | २७.५८% |
| | एकूण | १००% |

वरील तक्ता क्र. ८ चे निरिक्षण केले असता सोशल मिडियामुळे कृषी क्षेत्रामध्ये सुधारणा होण्यास मदत झाली आहे. असे मत मांडणारे ७२.४२% शेतकरी सुधारणा झाली आहे असे मत मांडणारे आहेत. तर २७.५८% लोकांना सुधारणा झाली नाही असे वाटते. यावरून असे स्पष्ट होते की, समाज माध्यमामुळे कृषी क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी मदत झाली आहे.

समाज माध्यमातील प्रभावी साधन म्हणुन फेसबुककडे पाहिले जाते फेसबुकवर कृषी संबंधित माहिती देण्यात येते. या माहितीचा लाभ शेतकरी घेतात का ? हे पाहण्यासाठी त्यांना फेसबुक पेजचा लाभ घेता का ? असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर मिळालेली माहिती खालील तक्त्यांत देण्यात आली आहे.

**तक्ता क्र. ९**

| अ.क्र. | घटक | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | होय | ४४.८२% |
| २ | नाही | ५५.१८% |
| | एकूण | १००% |

वरील तक्त्याचे निरिक्षण केले असता ४४.८२% शेतकरी या माहितीचा लाभ घेतात तर ५५.१८% शेतकरी या माहितीचा लाभ घेत नाहीत. यावरून असे स्पष्ट होते की, ५०% पेक्षा अधिक लोक शेतकरी कृषि विषयक माहिती मिळवु शकत नाही.

तसेच शेतकऱ्यानी समाज माध्यमामधुन शेती मालाच्या विक्रीसाठी व त्यांच्या भावाविषयी माहिती योग्य पध्दतीने देण्यात यावी अशी आपेक्षा व्यक्त केली आहे.

**निष्कर्ष व समारोप :-** प्रस्तुत शोध निबंधामध्ये कृषी क्षेत्रामध्ये समाज माध्यमांचा उपयोग केला जात आहे. ऑनलाईन खरेदी विक्रीसाठी याचा चांगला उपयोग केला जात आहे. शेतकऱ्यांना घरी बसल्या समाज माध्यमामुळे कृषी विषयक माहिती मिळत आहे. तसेच कृषी विषयक ॲप्सचा फायदा कृषी क्षेत्राला होत आहे.

वरील प्रमाणे कृषी क्षेत्राला समाज माध्यमांचा फायदा होत आहे. परंतु याचा फायदा घेणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या कमी आहे. ती वाढविण्यासाठी व प्रत्येक शेतकऱ्याला कृषि विषयक माहिती मिळण्यासाठी शासनाने गरीब शेतकऱ्यांना आर्थिक मदत करणे आवश्यक आहे.

□□□

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani